**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**
**<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>**

महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 24/07/2017 रोजी भरलेल्या माहे जुलै महिन्याच्या सर्वसाधारण तहकूब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळाची निवडणूक विषयी संस्थेच्या नियमावलीमधील नियम 2(ए), (बी) आणि 6 अनुसार तयार करावयाच्या मतयादीतून महानगरपालिका / नगरपरिषदांचे प्रतिनिधी म्हणून 03 नावांची शिफारस करण्याबाबतच्या, मा. महासंचालक (प्र.), अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था दिनांक 11/05/2017 यांचे परिपत्रक. |
| **ठराव क्र. 1849.**<br>**दिनांक 24 जुलै 2017** | (1) श्रीम. नेत्रा आशिष शिर्के,<br>(2) श्रीम. सलुजा संदीप सुतार,<br>(3) श्री. मनोहर कृष्णा मढवी.” |
| **निर्णय -** | **<u>03 सदस्य नियुक्ती</u>** |
| **विषय क्र. 02.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | प्रश्नोत्तरे |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 02.** | महानगरपालिकेचे दि. 29 मार्च 2017, दि. 18 एप्रिल 2017, दि. 26 एप्रिल 2017 (भाग-1 व 2) आणि दि. 19 मे 2017 रोजीचे इतिवृत कायम करण्यात आले. |
| **निर्णय -** | **<u>इतिवृत कायम करण्यात आले</u>** |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिका विदयमान क्षेत्राची विकास योजना तयार करणेकामी खाजगी संस्थेची नियुक्ती करणे ऐवजी विकास योजनेची कार्यवाही महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 21/06/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/2627/2017. |
| **<u>ठराव क्र. 1850.</u>**<br>**दिनांक 24 जुलै 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका विद्यमान क्षेत्राची विकास योजना तयार करणेकामी खाजगी संस्थेची नियुक्ती करणे ऐवजी विकास योजनेची कार्यवाही महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत करण्याच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, विकास योजना तयार करणेकामी महासभेचा दिनांक 22/08/2013 रोजी मंजूर ठराव क्र. 332 मध्ये अंशत: फेरबदल करुन खाजगी संस्थेची नियुक्ती करणे याऐवजी विकास योजनेसंबंधी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे |

| | |
|---|---|
| | कलम 23 व 38 अन्वयेची संपुर्ण वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत करण्यास, तसेच ठरावाप्रमाणे वेळोवेळीची पुढील वैधानिक कार्यवाही मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने नगर रचना विभागाने करण्यास, सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 07.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | बेलापूर विभागातील सेक्टर-3ए येथील गौरव म्हात्रे कला केंद्र येथे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र व अभ्यासिकेकरीता आवश्यक फर्निचर व आसन व्यवस्था पुरविणे आणि तत्सम कामे करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/07/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1088/2017. |
| **<u>ठराव क्र. 1851.</u>**<br>**दिनांक 24 जुलै 2017** | "बेलापूर विभागातील सेक्टर-3ए येथील गौरव म्हात्रे कला केंद्र येथे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र व अभ्यासिकेकरीता आवश्यक फर्निचर व आसन व्यवस्था पुरविणे आणि तत्सम कामे करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 94 लाख, 49 हजार, 249 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 08.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | घणसोली विभागातील प्रभाग क्रमांक 28 मधील तळवली येथील शांतीनगर व नामदेव वाडी परिसरात उर्वरित ठिकाणी मलनि:स्सारण वाहीन्या टाकण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/07/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1167/2017. |
| **<u>ठराव क्र. 1852.</u>**<br>**दिनांक 24 जुलै 2017** | "घणसोली विभागातील प्रभाग क्रमांक 28 मधील तळवली येथील शांतीनगर व नामदेव वाडी परिसरात उर्वरित ठिकाणी मलनि:स्सारण वाहीन्या टाकण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 78 लाख, 08 हजार, 799 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 09.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | तुर्भे सेक्टर 19 येथील मध्यवर्ती स्मशानभुमीची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/07/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1168/2017. |
| **<u>ठराव क्र. 1853.</u>**<br>**दिनांक 24 जुलै 2017** | "तुर्भे सेक्टर 19 येथील मध्यवर्ती स्मशानभुमीची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 2 कोटी, 81 लाख, 04 हजार, 204 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 10.**<br>**दिनांक 19 जुलै 2017**<br><br>**<u>ठराव क्र. 1854</u>.**<br>**दिनांक 24 जुलै 2017**<br><br>**निर्णय -** | घणसोली सेक्टर-23 येथील नागरी सुविधांची (रस्ते, पावसाळी ड्रेन, जलवाहीनी, मलनि:स्सारण वाहीनी) एकात्मीक कामे करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/07/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1169/2017.<br><br>"घणसोली सेक्टर-23 येथील नागरी सुविधांची (रस्ते, पावसाळी ड्रेन, जलवाहीनी, मलनि:स्सारण वाहीनी) एकात्मीक कामे करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 11 कोटी, 86 लाख, 88 हजार, 844 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."<br><br>**<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 11.**<br>**दिनांक 19 जुलै 2017**<br><br>**<u>ठराव क्र. 1855.</u>**<br>**दिनांक 24 जुलै 2017**<br><br>**निर्णय -** | नेरुळ से. 20 डी ब्लॉक मध्ये गटर, रस्ता व पदपथ दुरुस्त करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/07/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1170/2017.<br><br>"नेरूळ से.20 डी ब्लॉक मध्ये गटर, रस्ता व पदपथ दुरुस्त करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 48 लाख, 26 हजार, 963 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."<br><br>**<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 12.**<br>**दिनांक 19 जुलै 2017**<br><br>**<u>ठराव क्र. 1856.</u>**<br>**दिनांक 24 जुलै 2017**<br><br>**निर्णय -** | नेरुळ से. 9 येथील जुनी समाजमंदिराची इमारत पाडून आधुनिक पध्दतीने “शैक्षणिक व सामाजिक” वापरासाठी नविन इमारत बांधण्याच्या (टप्पा क्र. 02) प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/04/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./603/2017.<br><br>"नेरूळ से.9 येथील जुनी समाजमंदिराची इमारत पाडून आधुनिक पध्दतीने “शैक्षणिक व सामाजिक” वापरासाठी नविन इमारत बांधण्याच्या (टप्पा क्र. 02) कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 1 कोटी, 76 लाख, 78 हजार, 116 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, सुधारित प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."<br><br>**<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 13.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | बेलापूर विभागातील भुखंड क्र. 72 से. 15 येथे वाहनतळ विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/07/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1185/2017. |
| **<u>ठराव क्र. 1857.</u>**<br>**दिनांक 24 जुलै 2017** | "बेलापूर विभागातील भुखंड क्र. 72 से.15 येथे वाहनतळ विकसित करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 1 कोटी, 11 लाख, 65 हजार, 831 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 14.**<br>**दिनांक 19 जुलै 2017** | बेलापूर विभागातील से.19/20 येथे पावसाळी गटार बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/07/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1186/2017. |
| **<u>ठराव क्र. 1858.</u>**<br>**दिनांक 24 जुलै 2017** | "बेलापूर विभागातील से.19/20 येथे पावसाळी गटार बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 2 कोटी, 06 लाख, 13 हजार, 314 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

## महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी

**माहे 19 जुलै 2017 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-**<br>प्र.क्र. 99, अंतर्गत नेरुळ से. 27 येथे एअर इंडिया कॉलनीच्या कुंपनभिंतीला लागून आम्रमार्गापर्यंत सर्व्हिस रस्ता तयार केल्यास से. 27 येथिल नागरिकांना आम्रमार्गावर पोहोचणेकरिता शॉर्टकट रस्ता तयार होईल. त्यामुळे नागरिकांच्या वेळेत तसेच वाहनांच्या इंधनात बचत होईल. त्या अनुषंगाने वर नमुद ठिकाणी उरण हायवेला समांतर से. 27 येथिल प्लॉट क्र. 69/11 ते आम्रमार्गापर्यंत नवीन रस्ता तयार करुन त्याचे डांबरीकरण करणे. | 15<br>जुलै | 1859<br>24/07/2017 | मंजूर |
| 2. | **श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 99, अंतर्गत से. 23-बी येथिल अंतर्गत सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 16<br>जुलै | 1860<br>24/07/2017 | मंजूर |
| 3. | **श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-**<br>बेलापूर विभागातील से. 27 व आम्रमार्ग यामध्ये पुर्वीपासून तलाव आहे. हा तलाव सध्या दुर्लक्षित होत आहे व त्याची दुरावस्था झालेली आहे. हा तलाव लोटस तलाव म्हणूनही ओळखला जातो. या तलावात सध्या भुमाफियांकडून डेब्रीज टाकून तलाव बुजविण्याचा प्रयत्न चालू आहे. कालांतराने हा तलाव जर डेब्रीजने बुजविला गेला तर सिडको भुखंड विक्री करेल व एक नैसर्गिक तलाव आपोआप नष्ट होईल. तरी तलाव व त्यालगतचा परिसर सिडकोकडून हस्तांतरित करुन घेवून या तलावाचे सुशोभिकरण केल्यास या परिसराचा पर्यटन स्थळ म्हणून ओळख निर्माण होईल म्हणून सदरचा तलाव व त्यालगतचे क्षेत्र तातडीने सिडकोकडून हस्तांतरित करुन घ्यावे, तसेच या जागेवर विकास आराखडयात उदयान व तलाव असे आरक्षण प्रालंबित करणे. | 17<br>जुलै | 1861<br>24/07/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 4. | **श्रीम. नंदा कुंदन काटे, यांजकडून:-**<br>प्र.क्र. 13, ऐरोली येथील मुख्य नाल्यालगत हलक्या वाहनांकरिता अग्नीशमन केंद्रापासून से. 18 पर्यंत जाणा-या रस्त्याच्या व नाल्यादरम्यान रस्ता नव्याने विकसित करण्यात यावा जेणेकरुन या भागात मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होणार नाही. | 18<br>जुलै | 1862<br>24/07/2017 | मंजूर |
| 5. | **श्रीम. नंदा कुंदन काटे, यांजकडून:-**<br>जी विभाग कार्यालयालगत मोठया प्रमाणात अंधाराचे साम्राज्य पसरलेले असते यामुळे या परिसरात भुरटया चोरांचे प्रमाण वाढले आहे. याकरिता याठिकाणी हायमास्ट लावणे. | 19<br>जुलै | 1863<br>24/07/2017 | मंजूर |
| 6. | **श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :**<br>प्र. क्र. 11, ऐरोली गाव साईनाथवाडी व छत्रपती कॉलनी येथील जुने जिर्ण झालेले लाईटचे दिवे बदलून LED लाईट बसविणे. | 20<br>जुलै | 1864<br>24/07/2017 | मंजूर |
| 7. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून:**<br>प्र. क्र. 14, से 19 व 20 येथिल शाळेत जाणा-या विदयार्थांना व पालकांना उन्हात व पाऊसात उभे राहुन स्कुल बसची वाट पहावी लागते त्यांचे उन्हा व पाऊसापासुन संरक्षण व्हावे यासाठी रस्त्याच्या कडेला निवारा शेड बांधणे. | 21<br>जुलै | 1865<br>24/07/2017 | मंजूर |
| 8. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून:**<br>प्र. क्र. 14, ऐरोली, प्लॉट नं. 74 या प्लॉटवर क्रिडा संकुल बांधणे. | 22<br>जुलै | 1866<br>24/07/2017 | मंजूर |
| 9. | **श्री. हरीश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**<br>ा से. 11 वाशी नवी मुंबई येथील अनावश्यक शौचालय तोडून त्याठिकाणी मासळी मार्केट, व्यायामशाळा व वाचनालय इ. बांधणे. | 23<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 10. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून:-**<br>सेक्टर 14 ते सतरा प्लाझा मॉल वाशी कोपरखैरणे पाम बीच रस्ता वर स्काय वॉक बांधणे. | 24<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 11. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून:-** महात्मा गांधी कॉम्पलेक्स सेक्टर 14 येथील महापालिकेचा बंद करण्यात आलेल्या जागेवर विरंगुळा केंद्र तसेच तरुणांसाठी व्यायामशाळा बांधणे. | 25<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 12. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून:-** प्रभागातील सर्व पदपथ सिडको निर्मित आहेत त्यांचे स्लॅब नियमित पडत असतात. तरी सर्व स्लॅब नविन करुन ठिकठिकाणी हेवी डयुटी स्लॅब बांधणे. | 26<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 13. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :** प्र. क्र. 83, जुईनगर अंर्तगत खराब होऊन चालण्यास असुरक्षित असलेल्या सर्व फुटपाथांची दुरुस्ती लवकरात लवकर करणे. | 27<br>जुलै | 1867<br>24/07/2017 | मंजूर |
| 14. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :** प्र. क्र. 83 अंर्तगत मे 2016 मध्ये सादर केलेल्या पाण्याच्या वाढिव व्यासाच्या पाईप लाईन टाकणे व गावात जाणा-या खराब रस्त्यांच्या डांबरीकरणाचे प्रस्तावात चालु दरानुसार किंमती टाकुन प्रशासकिय मंजुरी घेऊन लवकरात लवकर निविदा प्रक्रिया पुर्ण करणे. | 28<br>जुलै | 1868<br>24/07/2017 | मंजूर |
| 15. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :** प्र. क्र. 83, जुईनगर हा प्रभाग 'ब' विभागात येत असल्याने जुईनगरच्या सर्व प्रकारची सफाई व पाणीपुरवठा मलनि:स्सारण तसेच प्रशासकिय दाखल्यांची कामे 'ब' प्रभागातुनच करण्यात यावी व नागरिकांना आपली कामे करण्यासाठी तुर्भे येथील 'ड' विभागातून जावे लागु नये अशी प्रशासकिय रचना करणे. | 29<br>जुलै | 1869<br>24/07/2017 | मंजूर |
| 16. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्र. क्र. 51 मधील भक्ती अनुगंण सोसायटी समोरील पेव्हर ब्लॉक बसविणे. | 30<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **17.** | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 51 मधील बहुउददेशीय इमारतीचे प्रवेशव्दार व नामफलकाची दुरावस्था झाली आहे ती दुरुस्त करणे. | 31<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **18.** | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्र. क्र. 51 मधील नागरिकांच्या सोईसाठी स्मशानभुमीच्या मागील जागेचा सर्वे करुन तेथे भाजी-फळ मार्केट उभारणे. | 32<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **19.** | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-** प्र. क्र. 55 मधील सेक्टर 11 कोपरखैरणे येथील नोंदणीकृत ज्येष्ठ नागरीक संस्था सातत्याने से 11 मध्ये विरंगुळा केंद्राची मागणी 1 वर्षापासून करीत आहेत. सामाजविकास विभाग या विभागामध्ये 6000 स्के. मी. चे उदयान नाही असे सांगून मागणीस दाद देत नाही. माझ्या मते एखादया विभागात उदयान नाही म्हणून विरंगुळा केंद्र देता येत नाही. असे सांगणे म्हणजे पळवाढ शोधणे आहे. तरी मी खाली पर्याय पालिकेस सुचवित आहे 1) 6000 स्के. मी. मर्यादा पालिकेत प्रस्ताव आणून 2000 स्के. मी. करावी, 2) प्रभागामध्ये प्लॉट नं. 34 ओपन प्लॉट नगरपालिकेच्या अखत्यारीत आहे त्यास उदयानामध्ये कन्व्हर्ट करुन त्यात केंद्र दयावे, 3) प्रभागातील नगरपालिकेच्या शाळेतील अथवा समाज मंदिरमधील 1 रुम आरक्षित करणे. | 33<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **20.** | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-** प्र. क्र. 55, सेक्टर 11 कोपरखैरणे येथे (हसनामिया पटेल चौक ते रिलायन्स फ्रेश पर्यंत तसेच हसनामिया पटेल चौक ते आझाद मैदान पर्यंत तसेच हसनामिया पटेल चौक ते अय्यपा मंदिर पर्यंत) दोन्ही बाजूने लोखंडी रोलिंग बसविणे. | 34<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **21.** | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-** प्र. क्र. 55, सेक्टर 11 कोपरखैरणे येथील भूखंड क्रं. 19 सी, 19सी-1 येथे इनडोर गेम्ससाठी इमारत बांधणे. | 35<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 22. | **श्री. काशीनाथ वामन पवार, यांजकडून :** प्र. क्र. 97 मध्ये काही रस्त्यांच्या नाम फलकांची अत्यंत दयनीय अवस्था असून ते त्वरीत दुरुस्त करणे. | 36<br>जुलै | 1870<br>24/07/2017 | मंजूर |
| 23. | **श्री. काशीनाथ वामन पवार, यांजकडून :** प्र. क्र. 97 मध्ये से. 18, 18ए, 20डी, व 24 विभाग इत्यादी ठिकाणी सोसायटीच्या नावाचे माहितीसाठी मार्गदर्शक व दिशादर्शक फलक लावणे. | 37<br>जुलै | 1871<br>24/07/2017 | मंजूर |
| 24. | **श्री. काशीनाथ वामन पवार, यांजकडून :** प्र. क्र. 97 मध्ये से. 18, भु. क्रं. 206 हा नागरी आरोग्य केंद्रासाठी राखीव आहे. तरी त्यावर आरोग्य केंद्र उभारणे. | 38<br>जुलै | 1872<br>24/07/2017 | मंजूर |
| 25. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :** नवी मुंबई महानगरपालिका समाजविकास विभागाच्या वतीने सन 2017-18 विदयार्थी व युवक समितीच्या अंर्तगत असलेल्या योजनेच्यावतीने शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी जो अर्ज तयार करुन दिला आहे. त्यात लाभर्थी घटकांचा जो समावेश केला आहे. त्यात 1. विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलांना तसेच निराधर मुलांना. 2. नवी मुंबई क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना. 3. महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई कंत्राटी पध्दतीवर असलेल्या कामगारांच्या मुलांना. 4. नवी मुंबई कार्य क्षेत्रातील दगडखाण/बांधकाम/रेती/नाका कामगारांच्या मुलांना या शिष्यवृतीच्या अर्जात समावेश करण्यात यावा कि जो यापूर्वी नेहमीच केला जात होता व या लाभार्थींना शैक्षणिक शिष्यवृत्ती मिळत होती. | 39<br>जुलै | 1873<br>24/07/2017 | मंजूर |
| 26. | **श्रीम. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :** प्र. क्र. 94 अंतर्गत नेरुळ, सेक्टर 10 मधील गुडविल सोसायटी ते साईबाबा हॉटेल या दरम्यान 30 वर्षे जुनी सिडकोची मलनि:स्सारण वाहीनी काढून त्या ठिकाणी नविन मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. | 40<br>जुलै | 1874<br>24/07/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 27. | **श्रीम. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 94 अंतर्गत नेरुळ, सेक्टर 10 मधील शिवशक्ती अपार्टमेंट ते एकता अपार्टमेंट या दरम्यान 30 वर्षे जुनी सिडकोची मलनि:स्सारण वाहिनी काढून त्या ठिकाणी नविन मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. | 41<br>जुलै | 1875<br>24/07/2017 | मंजूर |
| 28. | **श्रीम. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :**<br><br>प्र.क्र. 94 अंतर्गत नेरुळ, सेक्टर 10 मधील कै. अण्णासाहेब पाटील उदयानात जॉगिंग ट्रॅक उभारणे व उदयानाची दुरुस्ती करणे. | 42<br>जुलै | 1876<br>24/07/2017 | मंजूर |
| 29. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :**<br><br>नवी मुंबई महानगरपालिकेकडून सध्या सन 2000 पर्यंत नवीन नळ जोडणी देण्यात येते आहे. परंतु जी घरे सन 2000 नंतर बांधलेली आहेत त्या घरांना त्याचा लाभ मिळत नाही राज्य शासनाच्या निर्णयाप्रमाणे सन 2015 पर्यंतची घरे पात्र करण्यात आलेली आहेत त्याप्रमाणे सन 2015 पर्यंतच्या घरांना किंवा कमीत कमी लोकांमध्ये (स्टँड पोस्ट) सार्वजनिक नळ देण्यात यावा. जेणे करुन त्यांची गैरसोय होणार नाही व पाण्यापासून वंचित रहावे लागणार नाही. | 43<br>जुलै | 1877<br>24/07/2017 | मंजूर |
| 30. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 01, ईश्वरनगर येथे सिध्दी विनायक मंदिर लगत असलेल्या कच्च्या रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करुन तेथे हेवीडयुटी गटार बांधणे. | 44<br>जुलै | 1878<br>24/07/2017 | मंजूर |
| 31. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 01 ईश्वरनगर येथील संपुर्ण प्रभागातील पदपथांची व गटारांची अत्यंत दुरावस्था झालेली असुन दुरावस्थेत असलेल्या पदपथांची व गटारांची तातडीने दुरुस्ती करणे. | 45<br>जुलै | 1879<br>24/07/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 32. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-** प्र. क्र. 64 अंतर्गत, वाशी , सेक्टर 04 येथील ई. एस.आय.एस. वसाहत प्लॉट नंबर 16 येथिल बिल्डींग विना वापर गेल्या 35 वर्षापासून पडित आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना या भुखंडामुळे नाहक दुर्गंधी व अस्वच्छतेचा त्रास सहन करावा लागत आहे. तरीही हा प्लॉट नं. 16 महापालिकेकडे हस्तांतरित करुन डी. पी. प्लॅनमधून बहुउद्देशिय वापर करणे. | 46<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 33. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड यांजकडून :-** प्र. क्र. 64 अंतर्गत, वाशी, सेक्टर 6, 7 व 8 येथील फुटपथावर ब-याच ठिकाणी वृक्ष लावण्यांत आले होते व हे वृक्ष मोठे होवून एका बाजूने वाकण्यास सुरुवात झाली आहे व कधीही हे वृक्ष पडून अपघात घडू शकतो. तरी वाशी 6, 7, व 8 येथील फुटपाथवर सर्व छोटे -मोठे वृक्ष स्थलांतरित करणे. | 47<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 34. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड यांजकडून :-** प्र. क्र. 64 अंतर्गत, वाशी, सेक्टर 06 सब-वे लगत (एन.बी.एस.ए. टेनिस कोर्ट समोर) असलेले सर्कलचे सुशोभिकरण करणे. | 48<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 35. | **श्रीम. निर्मला आनंदराव कचरे, यांजकडून :**<br>प्र. क्र. 52 मधील सेक्टर - 14 येथील मलनि:स्सारण केंद्र (पंप हाऊस) या ठिकाणी सुरक्षित भिंत (कंपाऊंड) बनवणे. | 49<br>जुलै | 1880<br>24/07/2017 | मंजूर |
| 36. | **श्रीम. निर्मला आनंदराव कचरे, यांजकडून :**<br>प्र. क्र. 52 मधील सेक्टर - 14 येथील प्लॉट नं. 22, येथे नागरी सुविधा केंद्र बनविणे. | 50<br>जुलै | 1881<br>24/07/2017 | मंजूर |
| 37. | **श्रीम. निर्मला आनंदराव कचरे, यांजकडून :** प्र. क्र. 52 मधील सेक्टर - 14 येथील होल्डींग पॉईट बाजूला 03 बेल्ट सुशोभीकरण करणे. | 51<br>जुलै | 1882<br>24/07/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 38. | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :** प्रभाग क्र. 89, शिरवणे येथील जयवंत पंढरीनाथ भोईर घर क्र. 339, 340, 341 यांच्या बिल्डींग शेजारील परिसरात गटार व पदपथांची दुरुस्ती करणे | 52<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 39. | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार यांजकडून :** प्र. क्र. 89, येथील हिरा वादया सुतार यांच्या बिल्डींग शेजारील परिसरात गटार व पदपथांची दुरुस्ती करणे. | 53<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 40. | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार यांजकडून :** प्र. क्र. 89, येथील मनोहर हरी सुतार यांचे घर व केबल ऑफीस समोरील बाजूस असलेल्या गटार व पदपथांची दुरुस्ती करणे. | 54<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 41. | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :** प्र. क्र. 30, मधील सेक्टर 16 मध्ये पथदिवे बसविणे व त्यांच्या फिटींग बदलविणे व नव्याने विकसित झालेल्या सेक्टर 15 मध्ये पथदिवे (स्ट्रीट लाईट) बसविणे. | 55<br>जुलै | 1883<br>24/07/2017 | मंजूर |
| 42. | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :** प्र. क्र. 30, मधील तळवली गाव स्मशानभूमी मध्ये बसण्यासाठीचे शेड वाढविणे, चौथ-यावर शेड बांधणे व नवीन स्टॅड बसविणे. | 56<br>जुलै | 1884<br>24/07/2017 | मंजूर |
| 43. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :** प्र. क्र. 96, नेरुळ, मधील सेक्टर 16 येथील छात्रपती संभाजी राजे उदयानात शौचालय बांधणे | 57<br>जुलै | 1885<br>24/07/2017 | मंजूर |
| 44. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :** प्र. क्र. 96, नेरुळ, मधील सेक्टर 16A, भुखंड क्रमांक 150 व 151 शेजारी हायमास्ट बसविणे. | 58<br>जुलै | 1886<br>24/07/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **45.** | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 96, नेरुळ, मधील सेक्टर 18 येथील छात्रपती शिवाजी महाराज चौकात पाणपोई उभारणे. | 59<br>जुलै | 1887<br>24/07/2017 | मंजूर |
| **46.** | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 23, ऐरोली से. 09 येथील काजल अर्पा. समोर पावसाळी हेवी डयुटी गटार बांधणे. | 60<br>जुलै | 1888<br>24/07/2017 | मंजूर |
| **47.** | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 23, ऐरोली से. 09 व 10 मध्ये दिशा दर्शक फलक लावणे. | 61<br>जुलै | 1889<br>24/07/2017 | मंजूर |
| **48.** | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 23, ऐरोली से. 09 येथील कल्पना पार्क सोसायटी समोरील मोकळया जागेत जेष्ठ नागरिकांसाठी निवारा शेड बांधणे. | 62<br>जुलै | 1890<br>24/07/2017 | मंजूर |
| **49.** | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :**<br><br>नवी मुंबई महानगरपालिकेने ठाणे-बेलापुर रोड वरील पावणे नाका येथे रिक्षा, टेम्पो, ट्रक, कार आणि दुचाकी वाहनासाठी वाहनतळ बनविणे. | 63<br>जुलै | 1891<br>24/07/2017 | मंजूर |
| **50.** | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :**<br><br>पावणेगांव येथील अंतर्गत विदयुत सुविधा सुधारणा कामे पुर्ण महानगरपालिका व एम. एस. ई. बी. यांनी करावे. | 64<br>जुलै | 1892<br>24/07/2017 | मंजूर |
| **51.** | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :**<br><br>श्रमिक नगर येथील अंतर्गत विदयुत सुविधा सुधारणा संपूर्ण कामे, महानगरपालिका व एम. एस. ई. बी. यांनी करावीत. | 65<br>जुलै | 1893<br>24/07/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 52. | **श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :** प्र. क्र. 35 मधील भुखंड क्रमांक 04 सामाजिक सुविधा-01 व भुखंड क्रमांक 05 सामाजिक सुविधा 02 या आरक्षित भुखंडावर घणसोली कॉलनीमधील नागरीकांकरीता सांस्कृतिक समाज हॉल, मुलांसाठी अभ्यासिका, लायब्ररी, व्यायामशाळा व बाजार मंडई, व पीठाची गिरण(चक्की) करणे. | 66 जुलै | 1894 24/07/2017 | मंजूर |
| 53. | **श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :** घणसोली व कोपरखैरणे विभागामधील नागरीकांच्या मागणीनुसार पामबीच रस्त्यालगत नागरीकांसाठी जॉगींग ट्रॅक करणे. | 67 जुलै | 1895 24/07/2017 | मंजूर |
| 54. | **श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :** घणसोली कॉलनी मध्ये असलेल्या मोठया नाल्याची पीसीसी तसेच गाळ काढून नाल्याच्या दोन्ही बाजुला संरक्षित भिंत बांधणे. | 68 जुलै | 1896 24/07/2017 | मंजूर |
| 55. | **श्री. विजय लक्ष्मण चौगुले, यांजकडून :** प्र. क्र. 07 येथे मोठया नाल्यावरती स्लॅब टाकून फेरीवाला क्षेत्र विकसित करणे. | 69 जुलै | 1897 24/07/2017 | मंजूर |
| 56. | **श्री. विजय लक्ष्मण चौगुले, यांजकडून :** प्र. क्र. 07 येथे मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे. | 70 जुलै | 1898 24/07/2017 | मंजूर |
| 57. | **श्री. विजय लक्ष्मण चौगुले, यांजकडून :** चिंचपाडा येथील MIDC रोड ते रिलायबल प्लाझा पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | 71 जुलै | 1899 24/07/2017 | मंजूर |
| 58. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी :** प्र. क्र. 84 सेक्टर 02 मध्ये STP साठी राखीव भुखंडांचे आरक्षण बदलून त्याऐवजी क्रिडासंकुल (स्विमिंग पूल व जिमखाना) असे आरक्षण करणे. | 72 जुलै | 1900 24/07/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 59. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी :** प्र. क्र. 84 सेक्टर 02 मध्ये गोसावी व लिंगायत समाजासाठीच्या दफन भूमीसाठी दिलेला भुखंड हा शाळेच्या लगत व लोकवस्तीलगत असल्यामुळे त्या भुखंडाचा बदल करुन त्या समाजाला अन्य ठिकाणी आरक्षित भुखंड देणे. | 73 जुलै | 1901 24/07/2017 | मंजूर |
| 60. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी :** प्र. क्र. 84 सेक्टर 04 स्मशानभूमी समोरील गटार बंदीस्त करुन त्याठिकाणी पार्कींग सुरु करणे. | 74 जुलै | 1902 24/07/2017 | मंजूर |
| 61. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :** प्र. क्र. 82 सेक्टर 25 आनंदवन सोसायटी ते अपोलो सोसायटी पर्यंत हेव्ही डयुटी गटार बांधणे. | 75 जुलै | 1903 24/07/2017 | मंजूर |
| 62. | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :** प्र. क्र. 92 दारावे येथील श्री. विश्वनाथ म. पाटील यांच्या घरापासुन ते श्री. बाळकृष्ण ठा. नाईक ते श्री माने यांच्या घरापर्यंतचा रस्ता नादुरुस्त झालेला आहे. त्यामुळे तेथील नागरीकांना फार त्रास होत आहे तरी सदर रस्त्यांची सुधारणा करुन डांबरीकरण करणे. | 76 जुलै | 1904 24/07/2017 | मंजूर |
| 63. | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :** प्र. क्र. 92 दारावे येथील सार्वजनिक शौचालय ते श्री. विठठल-रुक्मिणी मंदिर परिसर नेरुळ सेक्टर 23 येथील आ.सी.सी. गटारे व पदपथ नादुरुस्त झालेले आहेत तरी सदर भागातील गटारांची दुरुस्ती करुन पदपथ बांधणे. | 77 जुलै | 1905 24/07/2017 | मंजूर |
| 64. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :** प्र. क्र. 101 मधील आग्रोळी गाव आय.टी.आय. समोरील शौचालय ते अर्बनहाट येथील गेटपर्यंतची सिडकोकालीन नादुरुस्त गटारे नव्याने बांधणे | 78 जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 65. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील यांजकडून :**<br>प्र. क्र. 101 मधील आग्रोळी उडडाण पुलाखालील ओपन जागेत ओपन जिम व येथील रहिवाश्यांसाठी, गावक-यांसाठी मंगल कार्यालय बनविणे. | 79<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 66. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील यांजकडून :**<br>प्र.क. 101 मधील सेक्टर 26/27 मधील पारसिक हिल येथे अनेक नागरीक सकाळी, संध्याकाळी जॉगींग, वॉकींग व मनोरंजनासाठी येत असतात. तसेच अनेक वयोवध्द जेष्ठ नागरीक फेरफटका मारत असतात. अशा ठिकाणी तरुणांसाठी ओपन जिम व जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र अथवा विश्रांतीसाठी गजेबो बांधणे. | 80<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 67. | **श्रीम. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :**<br>सानपाडा गावातील लोकसंख्येत व गरजेपोटी बांधकामामुळे घरामध्ये झपाटयाने वाढ झाली आहे. सुमारे 12 वर्षापुर्वी सानपाडा गावात मलनि:स्सारण वाहिनी टाकण्यात आली परंतु तत्कालीन परिस्थिती व सदयस्थित परिस्थिती या मध्ये खुपअंतर झाले आहे. त्यामुळे सदयस्थित असलेली मलनिस्सा:रण वाहिनी त्यास अपुरी पडत आहे. तरी सानपाडा गावातील सर्व मलनि:स्सारण वाहीनी बदलुन त्याठिकाणी नविन मोठया व्यासाच्या मलनि:स्सारण वाहीनी टाकणे.. | 81<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 68. | **श्रीम. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :**<br>सानपाडा गावातील स्ट्रिट लाईट चे खांब हे नादुरुस्त तसेच अपुर्ण अवस्थेत आहेत त्यामुळे रात्रीच्या वेळेस संपूर्ण गावात अंधारमय परिस्थिती असते तरी सानपाडा गावातील विदयुत खांबाची सुधारणा करुन त्यामध्ये वाढ करणे | 82<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **69.** | **श्रीम. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :** सानपाडा सेक्टार 30 मधिल लोकमत परिसरालगत मोठया प्रमाणात डेब्रिज टाकल्यामुळे सदर परिसर दुर्गंधीमय झाला आहे. तसेच एकाबाजुला लोहमार्ग व दुस-या बाजूला महामार्ग असल्यामुळे सदर परिसरात मोकळी जागा नाही. त्यामुळे सदर परिसरातील रहिवाशीयांना अंतर्गत रस्त्याशिवाय पर्याय नाही तरी महामार्गालगत मोठया प्रमाणात असलेले डेब्रिज उचलुन सदर ठिकाणी वृक्ष लागवड करावी व सदर ठिकाणी लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी बसविणे. | 83<br>जुलै | 24/07/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **70.** | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :** सानपाडा सेक्टार 10 मधिल छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर हा सानपाडा से. 10 मधिल मुख्य चौक म्हणून परिचित आहे. सदर चौकात सानपाडा से. 10 मधिल सर्वच रहिवाशी सण, उत्सव एकत्रित रित्या साजरे करत असतात परंतु सदयस्थित सदर चौकाची झालेली व होत असलेली दुर्दशा पाहुन परिसरातील सर्वच जण नाराजी व्यक्त करुन प्रशासनास दोष देत आहेत. तरी सामाजिक बांधिलकीतुन सदर परिसराचे सुशोभिकरण करुन सदर चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे. | 84<br>जुलै | 1906<br>24/07/2017 | मंजूर |
| **71.** | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :**<br>सानपाडा सेक्टर 5 गजानन महाराज चौक ते जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्यावरुन दररोज हजारो कामगार वर्ग, शाळकरी मुले व रेल्वे प्रवाशी पायी प्रवास करत असतात. साधारणत: 15 ते 20 मिनिटे पायी प्रवास असलेल्या या रस्त्यावर कुठेहि मुतारी अथवा शैचालयाची व्यवस्था नसल्यामुळे विशेषत: महिला वर्गाची जास्त कुचंबना होत असते, तरि सदर रस्त्यालगत असलेल्या नाल्याशेजारी ई टॉयलेट बांधणे. | 85<br>जुलै | 1907<br>24/07/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **72.** | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :**<br><br>सानपाडा सेक्टर 6 हा सिडकोने स्मॉल इंडस्ट्रिज म्हणून विकसित केला सदर ठिकाणी लहान सहान उदयोग आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी कामगार वर्ग ट्रॉन्सपार्ट चालक, वाहक माथाडी वर्ग मोठया प्रमाणात आहे. परंतु सदर ठिकाणी शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे सदर वर्गाचे खुप हाल होत आहेत. तरी सदर ठिकाणी लवकरात लवकर शौचालयाची उभारणी करणे. | 86<br>जुलै | 1908<br>24/07/2017 | मंजूर |
| **73.** | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :**<br><br>नवी मुंबई महानगरपालिकेत शिक्षण विभागात संगणक प्रशिक्षणासाठी जे ठोक मानधनावर शिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. परंतू सदयस्थिती पाहता त्या शिक्षकांना काढून टाकण्यात आले आहे. त्या शिक्षकांची शाळा निहाय माहिती देण्यात यावी. मा. आयुक्त सो आपण शिक्षक कर्मचाऱ्यांसंदर्भात ठोस भुमिका घेणे | 87<br>जुलै | 1909<br>24/07/2017 | मंजूर |
| **74.** | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 12, सेक्टर-2 या येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब उद्यानातील समाज मंदिर प्रभागातील गरजू महिलांना महिला उदयोग भवनासाठी देणे. | 88<br>जुलै | 1910<br>24/07/2017 | मंजूर |
| **75.** | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :**<br><br>प्र. क्र. 12, सेक्टर-2 या ठिकाणी प्लेवर ब्लॉक बसविण्यात आले होते, परंतू सदयस्थितीत ते प्लेवर ब्लॉक संपूर्ण पणे नादुरुस्त झाले आहेत अशा तुटलेल्या ब्लॉक च्या ठिकाणी ते काढून टाकून कॉक्रिटीकरण करणे. | 89<br>जुलै | 1911<br>24/07/2017 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**